Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

# विद्यार्थी विकास विभाग

**Dr. T. M. Chougale**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/१४२ दि. १४/०८/२०२५

प्रति,
१. **मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२. **मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:— घोषवाक्य स्पर्धेबाबत.**
संदर्भ :— उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे कमांक युएनआय / विशि—१ / टे.क्र.४०/ई—१९६८१७५ यांचे दि. २२ जुलै, २०२५ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, विकसित महाराष्ट्र २०४७ चे Vision Document तयार करण्यासाठी मार्गदर्शक सुचना प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. या शासन निर्णयातील अ.क्र.६ येथे Vision Document साठी तथा याअंतर्गत घोषवाक्य निश्चित करण्यासाठी विविध घटकांकडून नाविण्यपुर्ण कल्पना/संकल्पना प्राप्त करुन घेण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत स्पर्धा आयोजित करण्यासंदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने शिवाजी विद्यापीठामार्फत घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. घोषवाक्य स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना आहेत.

१. घोषवाक्य स्पर्धेमध्ये सर्व संबंधित घटक (अधिष्ठता, प्राचार्य, आध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, पालक) हे सर्वजण सहभागी होवू शकतात.
२. घोषवाक्य हे प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, सुशासन या ४ आधारस्तंभाचा विचाार करुन तयार करण्यात यावा.
३. घोषवाक्य हे मराठी भाषेमध्ये असावे.
४. घोषवाक्य हे पाच ते दहा इतक्या मोजक्या शब्दात असावे.

तरी घोषवाक्य स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यानी गुगलफॉर्म मध्ये स्वत:बद्दल आवश्यक ती माहिती व घोषवाक्य तयार करुन दि. २२/०८/२०२५ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत भरावी. यानंतर स्पर्धकांना स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवता येणार नाही.

गुगल लिंक : https://forms.gle/Z38t4bTvJx5aPA2U6

सदर प्राप्त घोषवाक्याचे परीक्षण विद्यापीठातील नियुक्त तज्ञांकडून केले जाईल. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल. या स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय कमांक प्राप्त करणाऱ्या पुरस्कार्थीचा संपूर्ण तपशील उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठवून देण्यात येईल.

कळावे,

आपला विश्वासू
प्र.संचालक
विद्यार्थी विकास